**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** सासवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/01/2026 16:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 03/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/01/2026

**Time From (वेळेपासून):** 09:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/01/2026 **Time (वेळ):** 14:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/01/2026 14:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सासवड पोलीस स्टेशन चे परिसरात,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुहास गणेशराव हट्टेकर पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ,सासवड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881873330

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास लक्ष्मण ओमासे पोलीस हवालदार ब.नं. 2533 | | | 1. सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामी,सासवड,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद जबाब फिर्याद जबाब दिनांक- 06/01/2026
मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय-37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9881873330

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 24/12/2025 रोजी 14.45 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार श्री. विशाल कमलाकर कामठे वय 32 व्यवसाय -भाजीपाला विक्री रा कुभारवळण ता पुरंदर, जि. पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले.व सदर कारवाई करीता तहसील कार्यालय हवेली पुणे येथील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले.आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली.16.00 वा पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले त्यांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे 1) श्री.आशिष बाप्पू आगनेन, वय 34 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-कोतवाल,तहसील कार्यालय हवेली जि पुणे रा.मु.पो.भोई आळी,जिल्हा परिषद शाळेजवळ,नांदेडगाव पुणे, मो न 9766598888. 2) श्री सुमंत विदयानंद शिंदे, वय 29 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-कोतवाल,तहसील कार्यालय हवेली जि पुणे रा शिंदे वस्ती, निलज्योती कॉलनी,एम.आय.जी.गोखले नगर,जनवाडी चतु:श्रृंगी पुणे, मो नं. 9657257386असे सांगितले.त्यांची तक्रारदार विशाल कामठे यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्याची तक्रार सांगितली व स्वत:चे हस्ताक्षरात लिहून दिली.

तक्रारदार यांनी तक्रारीत सांगितले कि,त्यांचा त्यांचेत आणि त्याचे चुलते सुभाष चंद्रभान कामठे यांचेमध्ये जमीनीवरून कौटूंबिक वाद सुरू आहेत. सदरबाबत सिव्हील केस सुरू आहे. माझे चुलते यांनी सासवड पोलीस स्टेशन येथे माझेविरूदध व माझे वडीलाविरूदध एन. सी. 21/11/2025 रोजी दाखल केली आहे.सदर एन सी बाबत सासवड पोलीस स्टेशन येथिल पोलीस हवालदार ओमासे यांचा मला दिनांक 23/12/2025 रोजी दुपारी 3.30 वा त्यांचा मो नबर 7499843407 यावरून माझा मोबाईल नंबर 7499843406 यावर कॉल करून मला सासवड पोलीस स्टेशन येथे बोलावले. संध्याकाळी 6.00 वा चे सुमारास मी आणि माझे वडील सासवड पोलीस स्टेशन येथे गेल्यावर पोलीस हवालदार ओमासे यांनी माझे विरूदध दाखल एन सी मिटविण्यासाठी व मदत करण्यासाठी माझेकडून 1000/- रूपये घेतले व एवढया पैशात मिटणार नाही अजुन पैसे दयावे लागतील नाही तर जामीनदार तयार ठेवा. असे बोलून पैशाची मागणी केली. जर तुम्ही मला 3000रूपये दिले नाही तर तुम्हाला जेल मध्ये ठेवतो. असे बोलुन पोहवा ओमासे यांनी माझेकडे 3000/-रूपये लाचेची मागणी केली आहे. मला ओमासे यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नाही म्हणुन मी तक्रार अर्ज दाखल करीत आहे.

पंच व आम्ही तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या व पुढील कारवाई लोकसेवक व तक्रारदार यांचेती बोलणे होईल किंवा ते बोलावतील तेव्हा करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक 02/01/2026 रोजी लोकसेवक व तक्रारदार यांचे फोनवरून झालेल्या चर्चेप्रमाणे दिनांक 03/01/2026 रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार व पंचाना सुचना देवुन बोलविण्यात आले. पंच व स्टाफ यांना सकाळी 09.00 वा ला.प्र.वि.कार्यालय पुणे येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या व तक्रारदार सासवड जवळीत आर. कुदळे फार्म हाउस सासवड- ते कोडीत कापुरहोळ रोड येथे सकाळी 10.30 वा भेटतील असे ठरले.

दिनांक 03/01/2026 रोजी 09.30 चे दरम्यान आम्ही, पंच व मदतनीस असलेले अंमलदार पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/ विशाल माने आणि चालक सफौ/ चव्हाण असे सरकारी वाहन इरटिगा कार क्रमांक एम एच 12 यु सी 4109 मध्ये सापळा कारवाई व पंचनाम्याकरिता आवश्यक सर्व साहीत्य घेवुन बसलो असता पंचाना सर्वांची ओळख करून दिली व गाडीत बसुन आम्ही लाप्रवि कार्यालय, पुणे येथुन साधु वासवानी चौक- कॅम्प- कोंढवा - बोपदेव घाट मार्गे सासवड गावाचे अलिकडे आर कुदळे फार्म हाउस सासवड-कोडीत कापुरहोळ रोड येथे पोहचलो तेव्हा तक्रादार कामठे हे देखील तेथे आलेले होते. त्यावेळी 10.45 वाजले होते. तक्रारदार हे त्यांचे यामाहा एम टी 15 मोटारसायकल क्र. एम एच 12 वाय वाय 5865 सह सदर ठिकाणी आले होते. पुन्हा तक्रारदार कामठे यांची पथकातील मदतनीस अंमलदार आणि पंचांची पुन्हा ओळख करुन दिली.व सापळा कारवाईकरिता आणलेल्या लॅपटॉप, प्रिंटर, काळा कपडा,अॅन्थ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायोलेट टॉर्च, मेमरी कार्ड, व्हाईस रेकॉर्डर, व्हिडिओ रेकॉर्डर, स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य सोबत आणल्याचे पंचासमक्ष तक्रारदार यांना दाखविले.

तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांची तक्रार कायम असलेबाबत सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची सर्वासमक्ष पाहणी केली असता, त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32Gb micro SD U1 HCI C10 A1 दुसरे बाजुस 5316 DXKLH0C6 BM MADE IN CHAINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले.असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री विशाल कामठे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण पोशि विशाल माने यांचे मोबाईलमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन त्यंचा वन प्लस कंपनीचा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर एका बाजुस EVM Elite32GB Micro SD HC V10 EFTF32GMR0825 0032FA55W2517044242M छापलेले असल्याचे दिसुन आले सदर मेमरी कार्ड वन प्लस या मोबाईलमध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.

तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले त्याचे मोबाईलदवारे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले.तेव्हा 11.10 वाजले होते.त्यानंतर तक्रारदार व पंचाना त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने लोकसेवक ओमासे पोलीस हवालदार सासवड पोलीस स्टेशन यांचे कार्यालयात लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरिता सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सूरू करून तक्रारदार यांचे बनियनला आतील सेप्टी पीनच्या साहयाने लावून तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांचे मोटारसायकल क्र. एम एच 12 वाय वाय 5865 वरून लोकसेवकाचे कार्यालयात बोलणी करण्याकरिता रवाना केले तेव्हा 11.29 वाजले होते.

तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले तेव्हा त्यांचा रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला तेव्हा 12.09 वाजले होते. तेव्हा तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 व पंच क्र 02 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, "मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेवकाचे कार्यालय सासवड पोलीस स्टेशन येथे जावुन ते आहेत काय याबाबत विचारण केली असता ते बाहेर गेलेबाबत समजलेने मी त्यांना माझे मोबाइलवरून कॉल केला असता ते काही वेळान मी व पंच थांबलेल्या ठिकाणी आले व पंचाबददल विचारणा करून त्यांना तेथेच थांबण्यास सांगुन मला एकटयाला पोलीस स्टेशनचे मागील बाजूस चहाचे हॉटेलवर घेवुन गेले. तेथे त्यांनी प्रथम माझा मोबाईल काढून घेतला. व माझे व माझे वडीलांवर चॅप्टर कारवाई न करण्याकरिता मदत करतो म्हणून लोकसेवक ओमासे यांनी मला "मी तुला मदत करतो तुला करां लांगतीलं" असे म्हणाले असता मी त्यांना आता माझ्याकडे नाहीत एक तासभर दया असे म्हणाले असता लोकसेवक ओमासे यानी मला "किती ये तुझ्याकडे किती करशील" अशी विचारणा केली व " लोकसेवक ओमासे यांनी त्याच्या मोबाईलमध्ये 10000 असा आकडां टाईप करून दाखविला तेव्हा मी "दहा हजार एवढं, साहेबा..." हे माझा मोबाईलची हिस्ट्री चेक करा कारण काय झाल मला ना, काल ये ना बजाज फायन्सस हप्ता हे.. हप्ता परत एक दोन हजार, दोन तीन हजार पर्यंत देतो ".असे म्हणालो असता लोकसेवक ओमासे यांनी त्याच्या मोबाईलमध्ये 5,000 एवढं टाईप करून दाखविला. व "तहसील ला पाठवित नाय काय (लोकसेवक ओमासे यांनी पुन्हा त्याच्या मोबाईलमध्ये टाईप केलेला 5,000 आकडा तक्रारदार यांना पुन्हा दाखविला ) पटकीन करून टाक फक्त समोरच्याला काय बोलायचे नाय, त्या सामोरच्याला काय बोलायचे , तस सामोरच्याला काय बोलु नको.. " असे

सांगितले.त्यावेळी मी त्यांना सांगितले कि "दोन तीन हजारात मिटवा कि साहेब ..कंडीशन नाही. तेव्हा अचानक त्यांनी मला "कसली मशिन आणली बघू जरा थांब ..मशीन कसली बघू ..कसली मशीन आहे का तुझ्याकड.."असे बोलून माझे जर्किन व खिसे तपासले परंतु त्यांना काही मिळाले नाही.त्यांनतर लोकसेवक यांनी माझे कामाबाबत चर्चा केली व मी "पेमेंट बाबत विचारणा केली असता लोकसेवक ओमासे यानी "बघ कि पटकन पंधरा मिनटातच, आता थांब माझ्यासमोरच थांब पटकन कर लगेच..पाटकिनी कर चल पटकन कर.."असे बोलून लोकसेवक ओमासे यांनी मला त्यांचा मोबाईल दाखवत "हिकड बघ (लोकसेवक ओमासे यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलमध्ये 5,000 आकडा एवढं टाईप करून तक्रादार यांना दाखविला ) फक्त कोणाला बोलायच नाय. " असे बोलून मला 5000रूपये घेवुन येण्याबाबत सांगितले अशी हकीगत पंचासमक्ष सांगितली.

त्यानंतर पंच क्र. 1 श्री.अशिष आगनेन यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांचेसोबत लोकसेवक ओमासे यांचे सासवड पोलीस स्टेशन येथे गेले‌ा असता तेथे नव्हते काही वेळाने ते आमचे जवळ आले व माझेबाबत विचारणा करून मला तेथेचे थांबण्यास सांगुन तक्रारदार यांना पोलीस स्टेशनचे मागील बाजूस चहाचे हॉटेलवर घेवुन गेले मी दुरून त्यांना पाहत होतो.

त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक पोलीस हवालदार ओमासे यांनी लाच मागणी केलेल्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार श्री.विशाल कामठे यांनी यांनी त्यांच्या कडे असलेली 5,000/- रु. रक्कम आमचे व पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा असे एकुण 5,000/- रु. असलेचे दिसुन आले. सदर नोटांचे नंबर स्वतंत्र कागदावर लिहून त्यांवर पंच व माझी सही केली.

त्यानंतर सफौ चव्हाण यांनी यांनी शासकीय वाहनात पंच आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. व प्रात्यक्षिक करून दाखविले तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावली. अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री विशल कामठे यांचे पॅन्टचे समोरील बाजुच्या उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर स.फौजदार चव्हाण यांना प्रत्यक्ष सापळा पथकातुन वगळण्यात आले.

लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत येणार असल्याची माहिती पंच,तक्रारदार व पथकास देवुन पोशि विशाल माने त्यांना योग्य त्या सुचना दिल्या. व लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारल्यानंतर तक्रारदार यांना पॅन्टेच डावे बाजूचे खिशातील रूमाल काढून तोंडावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबतचा इशारा करणेबाबत सुचित केले. सापळा पथकातील टीम मधिल सर्वाना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. तक्रारदार व पंच यांचे निवेदन घेण्यात आले व त्याचे व्हिडीओ रेकॉडिंग करण्यात आले आहे. तेव्हा 13.01 वाजले होते.त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे बनीयनचे आतुन सेफटी पीनचे साहयाने लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री आशिष आगनेन यांना लोकसेवक पोलीस हवालदार ओमासे यांना लाचेची रक्कम देण्याकरिता त्यांचे सासवड पोलीस स्टेशन येथे तक्रारदार यांचे मोटारसायकल क्र. एम एच 12 वाय वाय 5865 यावरून 13.20 वाजता रवाना केले.

मी व सापळा पथक, पंच क्रमांक 2 श्री शिंदे यांचे सह सरकारी वाहनाने सासवड गावात जावुन गडीचे खाली उतरून सासवड पोलीस स्टेशनचे परिसरात आजूबाजूला जावून थांबलो होतो.काही वेळाने तक्रारदार व पंच हे पोलीस स्टेशनचे मागे जावुन थांबले व तक्रारदार हे कुठलाही पुर्वनियोजित इशारा न करता पंचासह मोटारसायकलवर जावून बसले व आम्हाला मागे येण्याचा इशारा केला. आम्ही सर्व सापळा पथक त्यांचे मागोमाग गणेश मंगल कार्यालय हडपसर रोड सासवड येथे जावुन थांबलो. तेथे तक्रारदार यांचा व्हाईस रेकार्डर काढुन बंद केला व रवाना केल्यापासुन काय घडले याबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि आम्ही सासवड पोलीस स्टेशन येथे लोकसेवकास लाच रक्कम देण्याकरिता गेलो असता ते तेथे मिळून आले नाही. त्यांना वारंवार मोबाईलवरून कॉल केले असता त्यांनी कॉल उचलले नाही. म्हणुन आम्ही बराच वेळ लोकसेवकाची वाट पाहून परत आलो.अशी हकीगत सांगितली.
सर्वानुमते दिनांक 03/01/2026 रोजीची सापळा कारवाई स्थगित करण्यात येवुन पुढील कारवाई दिनांक 05/01/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार, पंच व सापळा पथक असे लाप्रवि कार्यालय पुणे येथे येवुन झाले कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड सिलबंद

केले.तसेच लाच रक्कम 5000 रूपये ही लिफाफ्यात ठेवुन माझे ताब्यात ठेवली. व पुढील कारवाईदरम्यान वापरण्यात येणार असलेचे सांगितले. त्याप्रमाणे सर्वांना सुचना देण्यात आल्या.
दिनांक 05/1/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथकासह सापळा व पंचानाम्यासाठी आवश्यक साहीत्यासह सकाळी 10.40 वा लाप्रवि कार्यालय पुणे येथुन सरकारी वाहना क्रमांक एम एच 12 यु सी 4109 हीचेमध्ये बसुन रवाना होवुन उरळी कांचन - शिंदवणे घाट मार्गे सासवडजवळ वनपुरी गावाजवळील वनविभागाचे जागेमध्ये सर्वजण जावुन थांबलो. तेव्हा तक्रारदार विशाल कामठे हे त्यांचेकडील मोटारसायकल क्र. एम एच 12 वाय वाय 5865 यावरून आमचे जवळ आले तेव्हा 12.20 वाजले होते. मी तक्रारदार व पंच यांना पुन्हा सापळा पथकातील पोहवा/तावरे,मपोशि/पुजा डेरे व चालक पोहवा/दिपक दिवेकर यांची ओळख करून दिली. तक्रारदार आज लोकसेवक ओमासे यांची सासवड पोलीस स्टेशन येथे भेट घेण्याकरिता व लाच रक्कम देण्याकरिता जाणार असलेने दिनांक 03/1/2025 रोजीचे कारवाईत वापरलेले व सीलबंद केलेले मेमरीकार्ड दाखवून तेच पुन्हा वापरण्यात येणार असलेचे सांगुन ते डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन पुर्वीच्या फाईल जतन असलेचे पंचाची खात्री करून दिली. दुसरे मेमरी कार्ड सोनी कंपनीचे व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये टाकुन खात्री करून देण्यात आली. तक्रारदार कामठे व पंचाचे वक्तव्य घेण्यात आले.त्याचे मपोशि डेरे यांनी व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. तेव्हा 12.26 वाजले होते.त्यांनतर तक्रारदार यांनी यापुर्वी हजर केलेली व आमचे ताब्यात असलेलीस लाच रक्कम 5000रू पंच व तक्रारदार यांना दाखवुन आम्ही पोहवा/दिपक दिवेकर यांचे ताब्यात दिली. त्यांनी सदर रकमेस पुन्हा अँथ्रासिन पावडर लावुन पंचाना व तक्रारदार यांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म सांगुन ती लाच रक्कम तक्रारदार कामठे यांचे पॅन्टचे उजवे बाजूचे खिशात ठेवली. तक्रारदार यांना व पंचाना सुचना देवुन लोकसेवक यांनी लाच रक्कम स्वीकारल्यावर पुर्वनियोजित इशारा करण्याचे सांगितले. तसेच मपोशि डेरे यांना लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारल्यानंतर ताब्यात घेताना व्हिडीओ रेकर्डिग करण्याच्या सुचना दिल्या. तक्रारदार यांचे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावला. पंच क्रमांक 01 यांचेसह तक्रारदार यांचे मोटारसायकल वरून 12.57 वाजता लोकसेवकाचे कार्यालयाकडे रवाना केले. आम्ही सापळा पथक त्यांचे मागे काही अंतराने जावुन तक्रारदार व पंच सासवड पोलीस स्टेशन मध्ये गेलो असता आम्ही पोलीस स्टेशनचे मागील व पुढील बाजूस सापळा लावून थांबून राहीलो. बराच वेळ तक्रारदार हे लोकसेवकाची वाट पाहत पोलीस स्टेशनचे आवारात थांबून राहीले. काही वेळाने एक इसम तक्रारदार यांना पोलीस स्टेशनचे कक्षात घेवुन गेला.काही वेळाने तक्रारदार हे खोलीचे बाहेर आले व घाबरलेले दिसले आम्ही लगेच त्यांचेजवळ गेलो.त्यांना बाजूला घेवुन यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला तेव्हा 13.37 वाजले होते.व तक्रारदार यांना पंचासमक्ष काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले कि, लोकसेवकास माझा संशय आलेने त्यांनी मला रूममध्ये नेवुन माझा मोबाईल घेतला जर्किंग काढुन चेक केले. मला चेक केले असता त्यांना माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर (मशीन) दिसली. व कशाला आला असे विचारले असता मी त्यांना पेमेंट देण्याकरिता आलो असलेचे सांगितले. तेव्हा त्यांनी काही नाही असे बोलून मला सोडून दिले मी घाबरून तुमचेकडे आलो असे सांगितले. तसेच लोकसेवक पोलीस हवालदार ओमासे हे माझेकडून लाच रक्कम स्वीकारणार नाहीत तरी त्यांचेविरूदध ला.प्र.विभागामार्फत पुढील कारवाई करावी असे सांगितले. त्यांनतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकार्डरमधिल संभाषण पंचासमक्ष ऐकुन खात्री करून स्क्रीप्ट तयार केले. सर्व सापळा पथक, पंचासह सरकारी वाहनाने लाप्रवि कार्यालय पुणे येथे येवुन झाले कारवाईबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.दोन्ही मेमरीकार्डची हॅश व्हॅल्यू घेण्यात आली आहे.

तरी लोकसेवक विकास लक्ष्मण ओमासे पद हवालदार नेमणुक सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण यांनी तक्रारदार श्री विशाल कामठे यांचेविरूदध सासवड पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या एन. सी. मध्ये मदत करून कुठलीही चॅप्टर कारवाई न करण्याकरिता दिनांक 03/01/2026 रोजी पडताळणीदरम्यान लोकसेवक ओमासे यानी तक्रारदार यांना "किती ये तुझ्याकडे किती करशील" अशी विचारणा करून त्यांचे मोबाईलमध्ये प्रथम 10000रू आकडा टाईप करून व तक्रारदार यांनी दहा हजार एवढ होणार नाही असे सांगितले असता मोबाईलमध्ये 5000 रूपये आकडा टाईप करून 5000रूपये लाचेची मागणी करून "बघ कि पटकन पंधरा मिनटातच, आता थांब माझ्यासमोरच थांब पटकन कर लगेच..पाटकिनी कर चल पटकन कर.."असे बोलून लोकसेवक ओमासे यांनी तक्रारदार यांना पुन्हा त्यांचा मोबाईल दाखवत "हिकड बघ (लोकसेवक ओमासे यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलमध्ये 5,000 आकडा एवढं टाईप करून तक्रादार यांना दाखविला ) फक्त कोणाला बोलायच नाय. " असे बोलून लोकसेवक विकास लक्ष्मण ओमासे पोलीस हवालदार सासवड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण जि.पुणे यानी तक्रारदार श्री विशाल कामठे यांचेकडे 5000 रूपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली आहे. लोकसेवकास तक्रारदार यांचा संशय आलेने त्यांचे अंगाची झडती घेवुन त्यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर आहे हे

पंच



पाहून लाच रक्कम स्वीकारली नाही. म्हणून लोकसेवक पोलीस हवालदार ओमासे यांनी तक्रारदार यांचेकडून गैरकायदेशीर पारितोषण मागणी करून मिळविण्याचा प्रयत्न केला.
म्हणुन माझी त्याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
KUMAR RAMCHANDRA KADAM(I (Inspector)) / 14601000450KRKM7801F **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**